लोकमत

### शहरात केवळ चार केंद्रे सुरू राहणार : साथ ओसरत असल्याचे स्पष्ट संकेत

# दिलासा... कोरोना रुग्ण घटल्याने २९ कोविड केंद्र बंद

भीमगोंडा देसाई
लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शहर आणि जिल्ह्यातील कोरोना रुग्णसंख्या घटत असल्याने आरोग्य प्रशासन आणि स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्थांतर्फे कार्यरत एकूण ४७ पैकी २९ कोविड केअर केंद्रे नुकतीच बंद केली आहेत. ही सर्व केंद्रे कोरोनाची दुसरी लाट आल्यानंतर मार्चपासून सुरू होती; पण अलीकडे रुग्णसंख्या हजारांच्या आत आल्याने केंद्रे बंद करण्यात येत आहेत. बंद केलेल्यांत सर्वाधिक शहरातील १४ केंद्रांचा समावेश आहे.

कोरोनाची दुसरी लाट पहिल्यापेक्षा व्यापक प्रमाणात राहिली.जिल्ह्यात एका दिवसात तब्बल अडीच हजार बाधितांची संख्या पोहोचली होती. परिणामी बाधितांना बेड मिळत नव्हते. वेळेत ऑक्सिजन, व्हेंटिलेटर बेड न मिळाल्याने आणि योग्य उपचार न झाल्याने काही रुग्णांना जीव गमवावा लागला. यामुळे शासनाच्या आरोग्य विभागाने कोविड केअर सेंटर उभारण्यासाठी पुढाकार घेतला. आवश्यकतेनुसार त्यांची संख्या वाढवत नेली. शहरात महापालिकेतर्फे १८ केंद्रे चालविली जात होती. त्यांपैकी आता केवळ चार केंद्रेच कार्यरत आहेत. जिल्ह्यात तालुक्याच्या ठिकाणी २९ केंद्रे सुरू होती. त्यांपैकी १५ केंद्रे बंद केली आहेत. करवीर, हातकणंगले तालुक्यात प्रत्येकी दोन, तर उर्वरित तालुक्यात प्रत्येक एक केंद्र कार्यरत आहे.

## बंद कोरोना केंद्रातील नर्स, डॉक्टर बेरोजगार

कोविड केअर केंद्रात तात्पुरत्या स्वरूपात डॉक्टर, नर्स, स्वच्छता कर्मचाऱ्यांची नेमणूक केली होती.



केंद्रातील मनुष्यबळ आणि रुग्णांच्या जेवण, नाष्टा, चहापाण्यावर महिन्याला सरकार खर्च करीत होते. आता केंद्र बंद झाल्याने सरकारचा होणारा खर्च वाचणार आहे; पण केंद्रात काम करणाऱ्या बहुतांश बीएएमएस डॉक्टर, नर्स, स्वच्छता कर्मचाऱ्यांवर बेरोजगार होण्याची वेळ आली आहे.


> जिल्ह्यातील कोरोना रुग्णांची संख्या अलीकडे झपाट्याने कमी होत आहे. यामुळे गरज नसलेली तालुक्याच्या ठिकाणची कोविड केंद्रे बंद केली आहेत. आवश्यकता वाटल्यास केंद्रे पुन्हा सुरू करण्यात येतील.
>
> **- डॉ. योगेश साळी,**
> जिल्हा आरोग्याधिकारी

> महापालिकेच्या नियंत्रणाखाली १८ कोविड केअर सेंटर सुरू होती. त्यांपैकी १४ केंद्रे बंद केली आहेत. चार केंद्रे कार्यरत आहेत. शहरातील रुग्णांची संख्या कमी झाल्याने हा निर्णय घेतला आहे.
>
> **- रविकांत आडसूळ,**
> उपायुक्त, महापालिका

## बंद प्रमुख केंद्रे अशी

- शिवाजी विद्यापीठ वसतिगृह क्रमांक एक, दोन, तीन, शेंडा पार्क, जैन बोर्डिंग, सायबर कॉलेज, महासैनिक प्रशिक्षण केंद्र, फुलेवाडी, दुधाळी पॅव्हेलियन हॉल, साने गुरुजी बॅडमिंटन हॉल, हॉकी स्टेडियम, विचारेमाळ येथील पंजाबराव देशमुख वसतिगृह, कसबा बावड्यातील अंडी उबवणी केंद्र आदी १४ कोविड केअर केंद्र बंद झाली आहेत.
- यामुळे बाधितांनी या केंद्रात उपचारासाठी जाऊ नये, आरोग्य यंत्रणेशी संपर्क साधावा, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे.

## महापालिकेच्या नियंत्रणाखाली कोविड केअर सेंटर्स



| १८ | १४ | ०४ |
|---|---|---|
| कोविड केअर सेंटर सुरू होती | कोविड केंद्रे बंद केली आहेत | कोविड केंद्रे कार्यरत आहेत |

**खर्चाची मोजदाद लवकरच :** महापालिका आणि सरकारच्या आरोग्य केंद्राच्या मदतीने चालवलेल्या कोविड केअर केंद्रावर दुसऱ्या लाटेत शासनाचे नेमके किती पैसे खर्च झाले याची मोजदाद प्रशासनातर्फे केली जात आहे. दोन दिवसांत किती निधी खर्च झाला, हे समोर येईल, असे प्रशासनातर्फे सांगण्यात आले.

## शहरात चार केंद्रे कार्यरत

- शहरात शिवाजी विद्यापीठातील डीओटी सेंटर, आयसोलेशन हॉस्पिटल, राजोपाध्येनगरातील साने गुरुजी कोविड रुग्णालय, कसबा बावड्यातील पॅव्हेलियन हॉलमधील केंद्र सुरू आहे.
- ही केंद्रे रुग्णांची संख्या पूर्णपणे कमी झाल्यानंतरच बंद करण्यात येणार आहेत. महापालिकेतर्फे चालवण्यात येणारी केंद्रही बंद झाल्याने तेथील आरोग्य यंत्रणेने साथीच्या इतर आजारांवर लक्ष केंद्रित केले आहे.

पुढारी

# ऑनलाईन कोर्सेसना यूजीसीची परवानगी

**नवी दिल्ली :** विद्यापीठाने अनुदान आयोगाने (यूजीसी) नियम शिथिल केले आहेत. कोरोनाचा संसर्ग संपल्यानंतर केंद्रीय आणि अन्य महाविद्यालयांना ऑनलाईन कोर्स सुरू करण्याचे आणि दूरस्थ शिक्षणाच्या माध्यमातून शिक्षण देण्यास यूजीसीने परवानगी दिली आहे. १२३ ऑनलाईन अभ्यासक्रम सुरी करण्याचा निर्णय घेतला आहे. यातील अभ्यासक्रम ४० पदव्युत्तर आणि ८३ पदवीच्या विद्यार्थ्यांसाठी असेल. देशभरातील सर्व विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमासाठी प्रवेश असणार आहे. प्रवेश घेण्यासाठी स्वयं या स्टडी वेब्स ऑफ ॲक्टिव लर्निंग फार यंग अस्पायरिंग मायंडस् याद्वारे प्रवेश अर्ज भरता येणार आहे. अधिक महिती युजीसीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

सकाळ



कोल्हापूर : भुईभिंगरी पुस्तकाचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी संजय शेलार, डॉ. नंदकुमार मोरे, प्रा. खोत, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. यू.के. सकट.

# 'भुईभिंगरी'मधून अनुत्तरित प्रश्नांना स्पर्श : डॉ. शिर्के

## प्रा. वसंत खोत यांच्या स्वकथनाचे प्रकाशन

कोल्हापूर, ता. २२ : 'भुईभिंगरी' हे प्रा. वसंत खोत यांचे स्वकथन शिक्षण क्षेत्रातील अनेक अनुत्तरित प्रश्नांना स्पर्श करणारे आहे. त्या अनुषंगाने समाजात सर्वंकष चिंतन होण्याची गरज आहे,'' असे मत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागातर्फे प्रा. वसंत खोत यांच्या पुस्तकाचे प्रकाशन कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते झाले. ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, ''भुईभिंगरीमधील सामाजिक भोवताल हा एका वेगळ्या अनुभवविश्वाचे प्रतिनिधित्व करतो. त्यामध्ये एकत्र कुटुंब आहे, त्याचे सर्व ताणेबाणे आहेत, तत्कालीन कष्टप्रद आयुष्यातून मुलाची आणि त्याच्या भवितव्याची सुटका व्हावी, म्हणून प्रयत्न करणारी आई आहे. वास्तवाच्या झळा आणि त्यातून निर्माण झालेले प्रश्न या पुस्तकामध्ये आहेत. ते समजावून घेऊन चिंतन करण्याची गरज आहे.''

मराठी अधिविभागाचे डॉ. नंदकुमार मोरे म्हणाले, ''सामान्य व्यक्तीच्या स्वकथनामध्ये इतिहासाच्या पाऊलखुणांचा महत्त्वाचा दस्तावेज म्हणून सामोरे येण्याची क्षमता असते.'' प्रा. खोत म्हणाले, ''अस्थिर भणंगपण, अपमान आणि मानहानीच्या जीवन कालखंडाचे कथन आहे.''

मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत केले. कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते प्रा. खोत यांचा शाल, ग्रंथभेट देऊन सत्कार केला. चित्रकार संजय शेलार, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. यु. के. सकट यांच्यासह मराठी अधिविभागाचे संशोधक, विद्यार्थी उपस्थित होते.

सकाळ

# डॉ. माशेलकर यांचे आज व्याख्यान



डॉ. रघुनाथ माशेलकर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाच्या वतीने सोमवारी (ता. २३) डॉ. रघुनाथ माशेलकर यांचे व्याख्यान आयोजित केले आहे. झूम या ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर दुपारी २.१५ वाजता व्याख्यान होईल. 'इनोवेशन लीड आक्सिलीरेटेड इन्क्लुसीव ग्रोथ' यावर डॉ. माशेलकर मार्गदर्शन करतील. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील, अशी माहिती विभागाचे प्रमुख प्रा. ज्ञानदेव तळुले यांनी दिली. अर्थशास्त्र विभागाच्या वतीने देश-विदेशातील अर्थतज्ज्ञ तसेच शास्त्रज्ञांची व्याख्यानमाला आयोजित केली आहे. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, विभागातील प्रा. डॉ. यशवंत थोरात, प्रा. तळुले आदी उपस्थित राहतील. विद्यापीठाच्या वेबसाईटवर सेमिनार, वर्कशॉप मथळ्याखाली लेक्चर सेरीज इन ईकॉनोमिक्स येथे व्याख्यानाची लिंक उपलब्ध करून दिली आहे. व्याख्यानात विद्यार्थी, संशोधक, शिक्षक, अन्य अभ्यासकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.

तरुण भारत

# उमेश गडेकर यांना पीएच.डी .

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट मधील सहायक संचालक उमेश गडेकर यांना समाजकार्य या विषयात मुंबई विद्यापीठाची पीएच.डी. पदवी प्राप्त झाली. खासगी सूक्ष्म वित्तीय संस्था आणि गरिबी निर्मूलन या विषयावरील प्रबंध त्यांनी विद्यापीठाला सादर केला होता. दारिद्र्य निर्मूलन करण्यासाठी खासगी सूक्ष्म वित्तीय संस्था मोलाची भूमिका बजावतात, असा निष्कर्ष या संशोधनात काढण्यात आला आहे. सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर तालुक्याचा त्यांनी विशेष अभ्यास केला आहे. त्यांना संशोधनासाठी मुंबई विद्यापीठातील राजीव गांधी समकालीन अभ्यास केंद्राचे संचालक डॉ. बालाजी केंद्रे, कै. डॉ. चंद्रकांत पुरी यांचे मार्गदर्शन लाभले.

